CMYK

प्रशिक्षणाच्या माध्यमातून निवडणूक कर्तव्य पार पाडणे सुलभ -जिल्हाधिकारी राऊत >>पान 3

उबाठा नेते सिद्धार्थ खरात सोमवारी दाखल करणार उमेदवारी अर्ज >>पान 4

**सुविचार**

शेवटी काय हो, आपण पत्त्याच्या नावाचे धनी, मजकुराचा मालक निराळाच. – पु.ल. देशपांडे


# दैनिक आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 03 रे ■ अंक 81 ■ रविवार, दि. 27 ऑक्टोबर 2024 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006




**जॅकी श्रॉफ यांनी प्राण्यांसाठी केला त्यांना विशेष आवडलेल्या गोष्टीचा त्याग**

आतील पान

# शिवसेना ठाकरे गटाची १५ उमेदवारांची यादी जाहीर! 'या' नेत्यांना मिळाली संधी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यात सध्या राजकीय रणधुमाळी सुरू आहे. निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर सर्वंच राजकीय पक्षांनी निवडणुकीची तयारी सुरू केली आहे. अनेकांनी आपले उमेदवार जाहीर केले आहे.

महाविकास आघाडीतील पक्षांनी देखील आपले उमेदवार जाहीर केले आहेत. शिवसेना उद्धव ठाकरे गटाने पहिली यादी जाहीर केली होती. त्यानंतर आता १५ उमेदवारांची दुसरी यादी जाहिर केली आहे. यात शिंदे गटाच्या विद्यामान आमदार यामिनी जाधव यांच्याविरुद्ध ठाकरे गटाने भायखळा विधानसभा मतदारसंघातून मनोज जामसुतकर यांना संधी दिली असून ही लढत चुरशीची होणार आहे.



**या नेत्यांना दिली संधी**

शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाने दुसऱ्या यादीत खालील उमेदवारांना संधी दिली आहे.

१) धुळे शहर– अनिल गोटे, २) चोपडा (अज)– राजू तडवी, ३) जळगाव शहर– जयश्री सुनील महाजन, ४) बुलढाणा– जयश्री शेळके, ५) दिग्रस– पवन श्यामलाल जयस्वाल, ६) हिंगोली– रूपाली राजेश पाटील, ७) परतूर– आसाराम बोराडे, ८) देवळाली (अजा) योगेश घोलप, ९) कल्याण पश्चिम– सचिन बासरे , १० ) कल्याण पूर्व – धनंजय बोडारे, ११) वडाळा– श्रद्धा श्रीधर जाधव, १२ ) शिवडी– अजय चौधरी, १३) भायखळा– मनोज जामसुतकर, १४) श्रीगोंदा– अनुराधा राजेंद्र नागावडे, १५) कणकवली– संदेश भास्कर पारकर.

### महाविकास आघाडीचा ९०-९०-९०चा फॉर्म्युला

महाविकास आघाडीचा जागा वाटपावरून मोठा तिढा सुरू होता. दरम्यान, तिन्ही पक्षाच्या नेत्यांनी ९०–९०–९० चा फॉर्म्युला स्वीकारला आहे. काँग्रेसचे नेते नाना पटोले, बाळासाहेब थोरात, यांनी दिल्लीत पक्ष नेत्यांना याची माहिती दिली आहे. मित्रपक्षांना १८ जागा दिल्या असून ९०–९०–९० हा फॉर्म्युला स्वीकारण्यात आला असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

### जागा वाटपावरून वाद सुरुच

काँग्रेस व उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत जागावाटपावरून तिढा कायम आहे. अनेक बैठका होऊन देखील काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले आणि शिवसेना नेते संजय राऊत यांच्यात या मुद्यावरून शाब्दिक वाद होत आहेत. मुंबई आणि विदर्भातील काही जागांवरून हा संघर्ष सुरू आहे. अर्ज भरण्याला मोजकेच दिवस शिल्लक राहिले असतांना देखील हा वाद संपलेला नाही.

## सावनेरमधून केदारांची बायको, बावनकुळेविरोधात तगडा उमेदवार, काँग्रेसची दुसरी यादी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीसाठी काँग्रसने आता दुसरी यादी जाहीर केलीय. काँग्रेसने पहिल्या यादीत ४८ नावे जाहीर केली होती. तर तिसऱ्या यादीत २३ उमेदवारांची नावे आहेत. श्रीराम पूरचे विद्यमान आमदार लहू कानडे पत्ता कट करण्यात आलाय. त्यांच्या जागी हेमंत ओगले यांना तिकीट देण्यात आलंय. सुनील केदार यांच्या पत्नी अनुजा केदार यांना सावनेरमधून उमेदवारी देण्यात आलीय. तर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याविरोधात सुरेश भोयार या तगड्या उम ेदवाराला संधी दिली आहे.

काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची शुक्रवारी दिल्लीत बैठक झाली. त्यानंतर काही जागांवर शिक्कामोर्तब झाले. आतापर्यंत काँग्रेसने ७१ उमेदवारांची यादी जाहीर केली आहे.

भुसावळ – राजेश मानवतकर
जळगाव – स्वाती वाकेकर
अकोट – महेश गांगणे
वर्धा – शेखर शेंडे
सावनेर – अनुजा केदार
नागपूर दक्षिण – गिरीश पांडव
कामठी – सुरेश भोयार
भंडारा पुजा ठावकर
अर्जुनी मोरगाव – दिलीप बनसोड
आमगाव – राजकुमार पुरम
राळेगाव – वसंत पुरके
यवतमाळ अनिल बाळासाहेब मांगुळकर
अर्नी – जितेंद्र मोघे
उमरखेड – साहेबराव कांबळे
जालना – कैलास गोरंट्याल
औरंगाबाद पूर्व – मधुकर देशमुख
वसई – विजय पाटील
कांदिवली पूर्व – काळु बधेलिया
चारकोप – यशवंत सिंग
सायन कोळीवाडा – गणेश यादव
श्रीरामपूर – हेमंत ओगले
निलंगा – अभयकुमार साळुंखे
शिरोळ – गणपतराव पाटील

## आमच्या पायगुणांमुळं प्रणिती शिंदे खासदार झाल्या, काँग्रेस नेत्याचा दावा

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूर/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकांच्या तारखा जाहीर झाल्या आहेत. २० नोव्हेंबर रोजी विधानसभा निवडणूक पार पडणार असून २३ नोव्हेंबरला निवडणुकांचे निकाल लागणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्ष जोरदार तयारीला लागलेत. तसंच यादरम्यान होणाऱ्या सभांमध्ये नेतेमंडळींकडून काय वक्तव्यं केली जातात, याकडंही सर्वाचं लक्ष लागलंय. अशातच सोलापूमध्ये बोलत असताना ''२०२४ च्या निवडणुकीत आमच्या पायगुणामुळंच प्रणिती शिंदे खासदारकीच्या निवडणुकीत विजयी झाल्या'', असा अजब दावा काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षांनी केलाय.सोलापूरचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष धवलसिंह मोहिते पाटील हे निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सोलापूरमधील काँग्रेस भवनात आले होते. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना त्यांनी विविध मुद्द्यांवर भाष्य केलं. यादरम्यान, ''लोकसभा निवडणुकीत माजी केंद्रीय मंत्री सुशीलकुमार शिंदे यांचा दोन वेळा पराभव झाला होता. मात्र, २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत आमच्या पायगुणांमुळं प्रणिती शिंदे खासदारकीच्या निवडणुकीत विजयी झाल्या'', असं धवलसिंह मोहिते पाटील म्हणाले. प्रणिती शिंदेंना ग्रामीण भागातून मिळाली आघाडी : प्रणिती शिंदे यांनी २०२४ मध्ये सोलापूरमधून खासदारकीची निवडणूक लढवली होती. या निवडणुकीत त्यांनी भाजपाचे उमेदवार राम विठ्ठल सातपुते यांचा मोठ्या मताधिक्क्यानं पराभव केला होता. सोलापूरमधून निवडून आलेल्या त्या पहिल्या महिला खासदार आहेत. दरम्यान, सोलापूर लोकसभा मतदारसंघात अक्कलकोट, दक्षिण सोलापूर, पंढरपूर, मंगळवेढा, मोहोळ या ग्रामीण भागातून प्रणिती शिंदे यांनी लीड मिळाली होती, याची माहिती धवलसिंह मोहिते पाटील यांनी दिली.

# बँक बंद झाल्याने संतप्त खातेदाराने टाळे ठोकत कर्मचाऱ्यांना डांबले

दैनिक आपला विदर्भ

**सोलापूरातील प्रकार, ग्राहकाविरुद्ध गुन्हा**

**सोलापूर/प्रतिनिधी :** बँकेच्या आर्थिक कामकाजाची वेळ संपल्यानंतर बँक बंद केली असतानाही संतापलेल्या बँक खातेदाराने बँकेला बाहेरून टाळे ठोकले. यामुळे बँक कर्मचाऱ्यांना तब्बल दोन तास बँकेतच अडकून बसावे लागले. उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथे बँक ऑफ बडोदाच्या शाखेत हा प्रकार घडला. याप्रकरणी बँक प्रशासनाच्या फिर्यादीनुसार संबंधित ग्राहकाविरुद्ध सोलापूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

तानाजी नामदेव दरेकर (वय ४५, रा. काटी सावरगाव, ता. तुळजापूर) असे गुन्हा दाखल झालेल्या बँक ग्राहकाचे नाव आहे. याबाबत बँकेचे शाखाधिकारी आदित्य गणपती अकेला यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार तानाजी दरेकर हे या बँकेचे ग्राहक आहेत. दुपारी साडेचार वाजता ते बँकेत आर्थिक व्यवहारासाठी आले असता त्यांना बँक कर्मचाऱ्यांनी, बँकेच्या आर्थिक कामकाजाची वेळ संपली आहे, तुम्ही उद्या या, असे सांगितले. परंतु दरेकर यांनी बँकेतील आर्थिक व्यवहाराची तीव्र निकड असल्यामुळे तशी विनंती केली. परंतु बँक बंद होत असल्याचे कारण देत त्यांना पिटाळून लावण्यात आले.

तथापि, या घटनेमुळे मनस्ताप झालेल्या तानाजी दरेकर यांनी बँक प्रशासनाला धडा शिकविण्याचा डाव रचला. त्यांनी बँकेजवळच असलेल्या एका हार्डवेअर दुकानातून नवीन कुलूप खरेदी करून आणले आणि ते कुलूप बँकेच्या बाहेरील मुख्य दरवाजाला ठोकले. तब्बल दोन तास बँकेला कुलूप ठोकण्यात आल्याने बँकेत अधिकारी व कर्मचारी डांबून ठेवले गेले. दरेकर हे बँकेला कुलूप ठोकल्यानंतर चावी स्वत:जवळ ठेवून निघून गेले. त्यामुळे बँकेतील अधिकारी व कर्मचाऱ्यांना दोन तासापर्यंत बंद ठेवण्याबरोबरच शासकीय कामकाजात अडथळा आणला गेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## भारतीय सेना पाकिस्तानसाठी दहशतवादी; साई पल्लवीच्या वक्तव्यावर देशवासियांचा संताप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** दाक्षिणात्य अभिनेत्री साई पल्लवी ही गेल्या अनेक दिवसांपासून नितेश तिवारी यांच्या 'रामायण' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. या चित्रपटात ती माता सीतेच्या भूमिकेत दिसणार आहे. दरम्यान, तिचा एक व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला, ज्यात ती 'पाकिस्तानी लोकं भारतीय सेनेला दहशतवादी म्हणतात', असं म्हणाली आहे. या व्हिडीओवर नेटकरी विविध प्रतिक्रिया देत आहेत.



साई पल्लवीचा सोशल मीडियावर व्हायरल होणारा व्हिडीओ जुना आहे. हा व्हिडीओ जानेवरी २०२२ च्या मुलाखतीतील आहे. व्हिडीओमध्ये, 'साई पल्लवी हे बोलते की पाकिस्तानमधले लोक विचार करतात की आपली सेना ही दहशतवादी आहे. पण आपल्यासाठी तसं नाही. अगदी याच प्रमाणे आपल्यासाठी ते दहशतवादी आहेत. प्रत्येकाच्या विचारांवर किंवा आपण कोणत्या पद्धतीनं घेतो त्यावर अवलंबून आहे. महत्त्वाचं म्हणजे, मला हिंसा कळत नाही.'

दरम्यान, साई पल्लवीचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला असून तिला आता ट्रोलिंगचा सामना करावा लागत आहे. एका नेटकऱ्यानं कमेंट केली की 'भारतानं कधी दुसऱ्या देशांवर हल्ला केला आहे. ज्यामुळे त्याला दहशतवादी म्हटलं जाईल? तुम्हाला वाटतं नाही का की कायम भारताला पाकिस्तान आणि चीनच्या हल्ल्यापासून स्वत:च्या क्षेत्राचं संरक्षण करण्यासाठी अनेक गोष्टींचा सामना करावा लागला आहे? तर मग भारतीय सैनिकांना दहशतवादी का म्हणतील?' दुसरा नेटकरी म्हणाला की, 'ही फार वाईट गोष्ट आहे की कम्युनिस्ट साई पल्लवी रामायणाक माता सीतेची भूमिका साकारणार आहे. तर असं म्हणत आहे की पाकिस्तानीचे लोक भारतीय सेनेला दहशतवादीच्या रुपात पाहतात. आधी तर हिनं गोरक्षकांची तुलना ही ओसामाशी केली होती.' तिसरा नेटकरी म्हणाला, 'ती त्या कट्टरपंकी व्यक्तिंपैकी एक आहे, ज्याचा मी कधी सामना केलेला नाही. तिला या सगळ्या गोष्टींविषयी बोलण्याची कोणतीही समज नाही की भारतीय सेना आपल्या देशाची सुरक्षा करते.' 'विवाहबाह्य संबंध...', ऐश्वर्या अभिषेकला लग्न टिकवण्यासाठी काजोलने कोणता सल्ला दिला?

दरम्यान, साई पल्लवी ही 'रामायण' या चित्रपटात रणबीर कपूरसोबत स्क्रिन शेअर करणार आहे. तर दाक्षिणात्य सुपरस्टार यश हा रावणच्या भूमिकेत दिसणार आहे. यशनं ही भूमिका साकारणार असल्याचं सांगितलं इतकंच नाही तर त्याला ही स्क्रिप्ट आवडली म्हणून त्यानं होकार दिल्याचं त्यानं सांगितलं.

# महायुतीकडून अमित ठाकरेंना सपोर्ट करण्याची भूमिका

## मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांची माहिती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** आदित्य ठाकरे यांना सध्या राजकीय कावीळ झाला आहे म्हणून या ठिकाणी तीन पक्षामध्ये गैरसमज पसरवण्याच्या भुमिकेवर भाष्य करतात. स्वत: मात्र जोडी घेवून उबाठा सेना उमेदवार देता का असे म्हणत उमेदवार शोधायला जातात.अशी टिका मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी आदित्य ठाकरे यांच्यावर केली.तर अमित ठाकरेंना महायुतीकडून सपोर्ट करण्याची आमची भूमिका आहे, अंतिम निर्णय नेते घेतील, अशी टिप्पणी यावेळी शेलार यांनी केली.

तसेच यावेळी आशिष शेलार यांनी उबाठावर टिका करून खरपूस समाचार घेतला. ज्यांच्याकडे स्वत: कडे उमेदवार नाही त्यांनी दुसऱ्या बद्दल निरबुद्धपणाने बोलू नये, तसेच



ज्यांना कोर्टाने फटकारे दिले, ज्यांना कोर्टाने बेल देताना त्यांच्यावर टिपणी केली, त्यांनी पोलिस दलाच्या पोलिसांना वसुलीला लावले, त्या संबंधीत चौकश्या सुरु आहेत अशा प्रकरणामध्ये बोलणार्या माजी आरोपीच्या बोलण्याला किती महत्व द्यायचे याचा विचार अनिल देशमुख यांनीच करावा, असा खोचक टोलाही त्यांना अनिल देशमुख यांना लगावला.

तसेच नाना पटोले संदर्भात बोलताना ते म्हणाले की,काँग्रेसचे नेते नाना पटोले यांनी महाराष्ट्राची माफी मागितली पाहिजे,त्यांनी चैत्यभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची माफी मागावी, त्यांनी राहूल गांधी अमेरिकेत वक्तव्य करताना आम्हाले की, आम्हाला आरक्षणाची गरज नाही आणि त्यावर पटोले यांनी स्पष्टीकरण देत राहूल गांधी काय चुकीचे म्हणाले असे बोलून समर्थन केले आहे. आरक्षण काँग्रेसने दिले नसून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिले आहे. याचे भाव ठेवावे असे ते म्हणाले. तसेच नवाब मलिक यांच्या उमेदवारीला विरोध आहे. त्यांना जागा द्यायची की नाही हा त्यांच्या पक्षप्रमुखांचा प्रश्र्न आहे. पण आम्ही स्पष्ट सांगितले आहे की भारतीय जनता पार्टी नवाब मलिक याचे कोणत्याही स्थितीत काम करणार नाही आणि आम्ही त्यावर ठाम असल्याने शेलार यांनी सांगितले. तसेच शिवसेना उमेदवार ठरविणे माझे काम नसून मी फक्त माझे मत सांगितले मिलिंद देवरा हे उमेदवार म्हणून आले तरी भारतीय जनता पार्टी उत्साहाने काम करेल आणि त्यांना विजयी करेल. तसेच महायुतीत आमचे कोणतेही वाद नसून मी एकनाथ शिंदे, अजित पवार, देवेंद्र फडणवीस यांना विनंती करेन की, राज ठाकरे यांच्या सुपुत्राला एकत्रीत मदत करु ही आमची तयारी आहे पण अंतिम निर्णय आमचे प्रमुख तीन नेते घेतील. अशी माहिती मुंबई भाजप अध्यक्ष आशिष शेलार यांनी दिली.

# मनसेची चौथी यादी जाहीर, धंगेकरांच्या विरोधात तगडा उमेदवार रिंगणात

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांच्या याद्या जाहीर होत असून आता मनसेनं उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली. त्यामध्ये मुंबई, पुणे, कोल्हापूर, बीड, बुलढाणा आणि बीड जिल्ह्यातील मतदारसंघातील उमेदवारांची नावे जाहीर करण्यात आली या यादीत कसबा पेठ मतदारसंघातून रविंद्र धंगेकर यांच्या विरोधातगणेश भोकरेयांना उमेदवारी देण्यात आली आहे.

### मनसेची चौथी यादी.

१. कसबा पेठ – गणेश भोकरे
२. चिखली – गणेश बरबडे
३ कोल्हापूर उत्तर – अभिजीत राऊत
४. केज – रमेश गालफाडे
५. कलिना – संदीप उर्फ बाळकृष्ण हुटगी

राज ठाकरे यांनी लोकसभा निवडणुकीत महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला होता. लोकसभेला महायुतीला अपेक्षित यश मिळाले नाही. यानंतर आता राज ठाकरेंनी विधानसभेसाठी स्वबळाचा नारा दिला होता. त्यानंतर त्यांनी अनेक मतदारसंघात उमेदवार दिली. आज चौथ्या यादीत मनसेनं गणेश भोकरे यांना पुण्यातील कसबा पेठ या मतदारसंघातून उमेदवारी दिली आहे.

२०२३ मध्ये झालेल्या पोटनिवडणुकीपासून कसबा पेठ विधानसभा मतदारसंघ संपूर्ण राज्यात चर्चेचा विषय आहे. भाजपचा बालेकिल्ला असलेल्या हा मतदारसंघ काँग्रेसच्या ताब्यात आहे. कसब्यात काँग्रेसने धंगेकरांना उमेदवारी जाहीर केल्यानंतर आता या जागेवर मनसेनं भोकरे यांना उमेदवारी दिली.

तर चिखली मतदारसंघात भाजपच्या विद्यमान आमदार श्वेता महाले यांच्या विरोधात गणेश बरबडे यांना उमेदवारी दिली.



CMYK

## फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या!

आपण वर्षभर विविध सण साजरे करतो त्यात दिवाळी या सणाला विशेष महत्व आहे. दिवाळी सणाला सणांचा राजा म्हंटले जाते कारण दिवाळी हा एकमेव असा सण आहे जो पाच दिवस चालतो. लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांचाच आवडीचा हा सण आहे. या सणाचा उत्साह काही औरच असतो. या सणाइतका आनंद दुसऱ्या कोणत्याच सणात नसतो. दिवाळी सण म्हणजे दिव्यांचा सण, प्रकाशाचा सण. दिवाळीच्या पाच दिवसांच्या कालावधीत पणत्या, मेणबत्त्या, आकाशकंदील, नवी खरेदी, नवे कपडे, मिठाई, रांगोळी, दिवाळी अंक, धार्मिक गोष्टी, मित्र – मैत्रीणी, नातेवाईकांच्या भेटी, कौटुंबिक संमेलन आणि फटाके या साऱ्या गोष्टी आल्या. यातील सर्वात महत्वाचे म्हणजे फटाके. फटाके आणि दिवाळी हे तर जणू समीकरणच झाले आहे. फटाक्यांशिवाय दिवाळीच साजरी होऊ शकत नाही अशी आजची अवस्था आहे. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सगळेच फटाके उडवतात. वास्तविक दिवाळी हा दिव्यांचा सण आहे, फटाक्यांचा नाही तरीही दिवाळीत फटाक्यांना अवास्तव महत्व दिले जाते. दरवर्षी दिवाळीत फटाके उडवू नका, फटाक्यांमुळे होणाऱ्या दुष्पिणामांचा फटका केवळ मानव जातीलच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीला बसतो त्यामुळे दिवाळीत फटाके उडवू नका. फटाके उडवायचेच असेल तर हरित फटाके उडवा असे आव्हान सरकारतर्फे तसेच अनेक सामाजिक व सेवाभावी संस्थांकडून केले जाते मात्र त्याकडे सोयिस्करपणे दुर्लक्ष केले जाते. अर्थात काही लोक त्यांच्या आव्हानास प्रतिसाद देतात मात्र त्यांचे प्रमाण अतिशय कमी आहे. फटाक्यांचे समर्थन करणारे नेहमी म्हणत असतात की दिवाळीतच फटाके न वाजवण्याचे आव्हान का केले जाते ? याचे कारण असे आहे की दिवाळीत मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात. दिवाळी इतके फटाके इतर कोणत्याही वेळी वाजवले जात नाही. अधिक फटाके वाजवल्याने त्याचे दुष्परिणामही अधिक होतात. दिवाळीच्या काळात मोठ्या प्रमाणात फटाके वाजवले जातात त्यामुळे प्रदूषण वाढते. आधीच आपल्या देशाची हवा प्रदूषित आहे. मुंबई – दिल्लीसारख्या शहरांच्या हवेने धोक्याची पातळी गाठली आहे त्यात जर फटाक्यांच्या प्रदूषणाची भर पडली तर लोकांना श्र्वास घेणेही मुश्कील होईल तसे झाले तर त्याचा परिणाम केवळ मानवाच्याच नव्हे तर संपूर्ण सजीव सृष्टीच्या आरोग्यावर होईल. कॉपर, कॅडियम, लेड, गंधक, फॉस्फरस, सल्फर, मॅग्नेशियम, सोडियम, झिंक, नायट्रेट आदी रसायनांपासून फटाक्यांची निर्मिती केली जाते. ही रसायने मानवी आरोग्यास घातक आहेत. फटाक्यातील कॉपरमुळे श्र्वसनमार्गात दाह होतो. त्यामुळे दम्याच्या रोगांच्या आजारात वाढ होते. हृदयविकार आणि फुफ्फुसांचे आजार होण्याची शक्यता असते. लेड मज्जासंस्थेवर परिणाम करते. कॅडीयम मूत्रपिंडाचे नुकसान करते. सल्फर हे वनस्पतींसाठी घातक आहे. सल्फरमुळे वनस्पतींची वाढ खुंटते. सल्फरमुळे झाडांच्या फळावर अनिष्ट परिणाम होतो. ही फळे खाण्यात आल्यास खणाऱ्यांना विषबाधा होण्याचा धोका असतो. फटाक्यांमुळे होणाऱ्या ध्वनिप्रदूषणाचा लहान मुले, वयोवृध्द नागरिक, गरोदर महिला तसेच रुग्णांना खूप त्रास होतो. सतत चार ते पाच दिवस कानठळ्या बसवणाऱ्या आवाज ऐकल्यावर कायमचे बहिरेपणा येण्याची शक्यता असते. शिवाय फटाके फोडताना योग्य ती काळजी घेतली नाही तर अपघात होऊन कायमचे अपंगत्व येण्याची शक्यता असते. ऐन दिवाळीत फटाक्यांच्या दुकानांना किंवा कारखान्यांना आग लागून दुर्घटना घडल्याचे आणि त्यात जीवित आणि वित्त हानी झाल्याच्या अनेक घटना घडल्या आहेत हे देखील विसरता येणार नाही. या सर्व बाबींचा विचार केला तर फटाके किती घातक आहेत हे लक्षात येईल. फटाकेमुक्त दिवाळी साजरी करण्याची वेळ आली आहे. मानवी आणि सजीव सृष्टीवर परिणाम करणारे हानिकारक फटाके दूर ठेवून आपण दिवाळी साजरी केली तर वाढत्या प्रदूषणाला आळा घालता येईल शिवाय आरोग्यही चांगले राहील. चला तर मग फटाकेमुक्त दिवाळीचा संकल्प करू या! फटाके दूर करून हा आनंदाचा सण साजरा करू या!!

## मजबूत हृदयासाठी अष्टसूत्री

निरोगी आयुष्यासाठी हृदय मजबूत असण्याची गरज असते. मात्र बैठी कामे, जंगफूड, मद्यपान, धूम्रपान, जादा काम आणि जादा ताण यांनी हृदयाचे स्नायू दुबळे होतात हे टाळण्यासाठी खालील आठ गोष्टी आवश्यक आहेत.

१) मद्यपानाचा त्याग करा – केवळ हृदयाच्या आरोग्या साठीच नव्हे तर एकंदरीतच चांगले आणि प्रदीर्घ जीवन जगण्यासाठी मद्यपान टाळले पाहिजे. मद्यपान करणारी व्यक्ती हृदय विकाराने मरण्याची शक्यता जास्त असते. मद्यपान सोडून दिले की, ही जोखीम कमी होते. २) मीठ कमी करा – मिठामुळे उच्च रक्तदाब वाढतो. त्यामुळे मीठ शक्यतो कमी खाल्ले पाहिजे. बटाटा चिप्स्, खारे दाणे, मसाला काजू आणि भरपूर मीठ घालून फ्रिझर्व्हवर केलेले तयार खाद्य पदार्थ यात मीठ खूप असते. हे पदार्थ टाळले पाहिजेत.

३) आरोग्यदायी आहार – हृदयाची परिस्थिती सुधारण्यासाठी आणि निरनिराळे हृदयविकार टाळण्यासाठी खाणे आरोग्यदायी असले पाहिजे. खाण्यात फळे आणि भाज्या खूप असल्या पाहिजेत. अशा खाण्यामुळे हृदयविकाराची शक्यता कमी होतेच, पण हृदयावरच्या शस्त्रक्रियेनंतर परिस्थिती पूर्ववत होण्यासही मदत होते. या आरोग्यदायी खाण्यामध्ये सॅच्युरेटेड फॅटस् असलेली तेले (खोबरेल आणि पामतेल) तसेच साखर टाळली पाहिजे. मैद्यापासून केलेले बिस्किट, केक हे पदार्थही वर्ज्य केले पाहिजेत.

४) मद्यपानात घट – मद्यपानाच्या रुपाने शरीरात जाणारे अल्कोहोल हृदयाच्या स्नायूंवर दुष्परिणाम करते. मद्य रक्तदाब वाढवते आणि वजनही वाढवते. अतीमद्यपानामुळे कोणत्याही क्षणी हृदय विकारचा झटका येण्याची भीती असते. ५) कार्यरत रहा – हृदय मजबूत होण्यासाठी सतत कार्यरत राहिले पाहिजे आणि शारीरिक हालचाली वाढवल्या पाहिजेत. दिवसातून किमान ३० मिनिटे व्यायाम केला पाहिजे. कार्यरत राहण्याने आणि व्यायामाने शरीराबरोबर मनाचेही आरोग्य चांगले राहते.

६) वजन नियंत्रणात ठेवा – वजन मर्यादेच्या बाहेर वाढले की, आरोग्याचे अनेक प्रश्न निर्माण होतात. मधुमेह होतो आणि त्यातून पुढे आरोग्याच्या गुंतागुंती निर्माण होतात. कारण वजन वाढण्याने शरीरातील कोलेस्टेरॉल वाढते. ७) नियमित तपासणी – ब्लड प्रेशर, शुगर आणि कोलेस्टेरॉल यांची आपल्या रक्तातली पातळी सतत तपासत राहिले पाहिजे. सातत्याने रक्तदाब असणारी व्यक्ती दीर्घ आयुष्य जगू शकत नाही. ८) ताण तणाव – मर्यादेपेक्षा अधिक ताण–तणाव प्रकृतीला हानीकारक असतात. शारीरिक आणि मानसिक दोन्ही तणाव वाढू नयेत यासाठी काही काळज़ी घेण्याची गरज असते. प्रदीर्घकाळ केल्या जाणार्‍या कामांमध्ये अधूनमधून विश्रांती घेणे यादृष्टीने गरजेचे असते.

## लिव्हरसाठी घरगुती उपाय गुणकारी

सर्व जण आपापल्या शरीरासाठी वेगवेगळय़ा डॉक्टरांकडून टिप्स घेत असतात. त्यांनी दिलेल्या सल्ल्यानुसार आपली दिनचर्या ठेवतात. मात्र इतके सर्व उपाय करण्याऐवजी तुम्ही घरगुती उपाय करूनसुद्धा तुमच्या लिव्हरची नीट काळजी घेऊ शकता.स्मोकिंग, अल्कोहोल, तणाव व जंकफूड या गोष्टीमुळे लिव्हरवर ताण पडतो. यामुळे अनेकांना लिव्हरच्या संदर्भातील आजार उद्भवतात. त्यापासून मुक्तता मिळवायची असेल तर जेवणात नियमित हळदीचा वापर करावा. रात्रीच्या वेळी झोपताना चिमूटभर हळद दुधामध्ये टाकून दूध प्यावे. त्यामुळे तुमचे लिव्हर चांगले राहते व तुम्हाला कफ, खोकला या रोगांपासून मुक्तता मिळेल.१.आवळ्यामध्ये व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असते तसेच पोटासाठी आवळा फायदेशीर आहे. कारण या आवळय़ामध्ये लिव्हरचे रक्षण करण्याचे गुण असतात.२.जे लोक अल्कोहोलिक फॅटी लिव्हर रोगामुळे त्रस्त आहेत. त्यांच्या लिव्हरमध्ये ट्रान्सएमानेज एन्झाइम्सचे प्रमाण वाढते. ज्येष्ठमधातील तत्त्व या एन्झाइमचे प्रमाण लिव्हरमधून कमी करण्यात सक्षम आहेत. त्यामुळे ज्येष्ठमध लिव्हरसाठी लाभकारी ठरते.३.जुने लोक आपल्या तुळशीच्या रोपांसोबत गुळवेलीचेही रोप लावत, कारण गुळवेल ही तुळशीप्रमाणे आपले शरीर निरोगी ठेवण्यास मदत करते. म्हणून जुने लोक गुळवेलीची ४–५ पाने दररोज चावून चावून खात.४.जवसाच्या बियांमध्ये साइटोकॉन्स–टीट्यूएंट्स आढळून येते. त्यामुळे हार्मोन्सला एकत्रित होण्यापासून रोखले जाते. यामुळे लिव्हरवर कमी दाब पडतो.५.बीट, कोबी, गाजर, ब्रोकली, कांदा, लसूण, आदी भाज्या लिव्हरसाठी फायदेशीर असतात

## मातृत्व मिळताना घ्यावयाची काळजी

कोणत्याही स्त्रीच्या आयुष्यामध्ये मातृत्व प्राप्त होणे ही एक अनोखी घटना असते. परंतु माता होताना स्त्रियांनी काही पथ्ये पाळण्याची गरज असते. कारण तिला माता झाल्यानंतर काही जबाबदार्‍या येऊन पडत असतात. जर ती माता सतत आजारी पडत असेल तर ती त्या जबाबदार्‍या कशा पार पाडू शकेल? बर्‍याच महिला आपल्या आरोग्याच्या बाबतीत म्हणाव्या तेवढ्या दक्ष नसतात. त्यांना आपल्या प्रकृतीची हेळसांड परवडणारे नाही. म्हणूनच माता झालेल्या आणि होणार्‍या स्त्रियांनी खालील पथ्ये पाळली पाहिजेत.



१) आरोग्यदायी आहार – मातेला केवळ स्वत:चेच नाही तर आपल्या कुटुंबाचेही आरोग्य चांगले राहील याबाबत काळजी घ्यावी लागते. या आहारामध्ये फळे आणि भाजीपाला यांचा मोठा समावेश असला पाहिजे. मुलांचा आहार सुद्धा फळांनी युक्त असला पाहिजे, पण स्वत: मातेलाही फळांचा आहार केला पाहिजे.

२) चालते–हलते रहा – निरोगी आयुष्य जगण्यासाठी मातेला सतत हलते–चालते राहिले पाहिजे. कष्टाची कामे केली पाहिजेत. एका जागी बसून रहाता कामा नये. अन्यथा तिच्या शरीरावर चरबी वाढत जाते. त्यातूनच रक्तदाब आणि मधूमेह असे विकार जडतात. ३) मातेला चांगली झोप मिळण्याची गरज असते. अन्यथा हृदयाचे विकार जडण्याची शक्यता असते. कोणत्याही प्रौढ व्यक्तीने किमान ७ ते ८ तास झोप घेतली पाहिजे.

४) तणावाचे व्यवस्थापन – लहान–मोठा ताण–तणाव हा आयुष्यातला अपरिहार्य भाग असतो. तो टाळता येत नाही. परंतु जेव्हा तणाव गंभीर स्वरूपाचा असतो तेव्हा त्याचा गांभीर्याने विचार केला पाहिजे. त्याचे व्यवस्थापन केले पाहिजे, तो टाळला पाहिजे. ५) सर्वात महत्वाचे म्हणजे प्रकृतीच्या बाबतीत कसलीही जोखीम घेता कामा नये. वारंवार तपासण्या केल्या पाहिजेत आणि आपल्या पूर्वजांचा आरोग्याच्या बाबतीतील इतिहास आपल्याला माहीत पाहिजे.

## देशी-विदेशी झाडे : संशयकल्लोळ आणि निरसन

सध्या विदेशी झाडे लावावी की देशी प्रजातीची झाडे यावर वाद सुरु असतात. काही देशी झाडांची बाजू घेतात तर काही विदेशी प्रजातीच्या झाडांची. मात्र या वादाकडे पर्यावरणपूरक की पर्यावरण घातक यादृष्टीकोनातून पाहायला हवे. पर्यावरण दिनानिमित्त प्रा. डॉ. निनाद शहा

विविध देशात तेथील पोषक हवामान, अधिवास यानुसार विशिष्ट वनस्पती वाढत असतात. या वनस्पती आणि त्यावर अवलंबून असणारे वन्यजीव यांनी मिळून समृद्ध पर्यावरण निर्मिती होत असते. या पर्यावरणात परिसंस्थेच्या बाहेरच्या वनस्पती आल्या तर काय होते, हा सध्याच्या चर्चेचा विषय आहे. खरे तर विदेशी विरुद्ध देशी झाड, असा माझ्या दृष्टीने वाद नाही. तो पर्यावरणघातक विरुद्ध पर्यावरणपूरक, असा असावा. अनेक झुडुपे, वेली, झाडे भारतात रुजलेली आहेत, उपयोगी आहेत, असे काही जणांचे म्हणणे आहे. पण इथे लक्षात घेतले पाहिजे की या सर्व विदेशी वनस्पती (उदा. पेरु, सफरचंद, सीताफळ, द्राक्षे, ऊस, मिरची, बीट) शेती व्यवसायांतर्गत येतात. येथे त्यावर नियंत्रण असते, त्यांची काळजीपूर्वक निगा राखली जाते. या वनस्पती आक्रमकही नसतात.



आपल्या पर्यावरणीय वातावरणाला घातक वृक्षारोपणाला विरोध आहे. इथे विदेशी झाडप्रेमी म्हणतात की देशी झाडाप्रमाणे विदेशी झाडे सावली देतात, प्राणवायूची निर्मिती करताहेत आणि दिसायलाही रंगीबेरंगी फुलांमुळे सुंदर दिसतात. मग विरोध का? एक विदेशी झाड दहा स्थानिक झाडांना वाढू देत नसेल तर दहापट प्राणवायू निर्मिती आणि सावली कमी होते. हा तोटा आहे. आपल्या देशात विदेशी झाडांचे कीड आदी शत्रू नसल्याने त्यांना मोकळे रान मिळते. त्यामुळे ते देशी झाडांना वाढू देत नाहीत.

विदेशी झाडांमुळे आपली जैविक विविधता कमी होऊ लागली आहे. अशा तऱ्हेने देशी प्रजातीय विविधता कमी करून हे जीवशास्त्रीय प्रदूषण करतात. या विदेशी झाडांची पाने प्राणी अजिबात खात नाहीत. या झाडांवर काही पक्षी व किटक अधिवास करीत नाहीत. ही विदेशी झाडे ठिसूळ असतात. त्यांचे आयुष्यमान कमी असते. त्यांची पाने लवकर कुजत नाहीत आणि खतही तयार होत नाही. त्यामुळे जमिनीचे प्रदूषण होते. वादळात पहिल्यांदा ही झाडे उन्मळून पडतात आणि वाहतूक कोंडी करतात. काही विदेशी झाडे फुलसंभारामुळे सुंदर दिसतात. उदाहरणार्थ गुलमोहर, नीलमोहर, पीत मोहोर, स्पॅथोडिया इत्यादी. पण दृष्टीसुख सोडले तर पर्यावरणीय मूल्य शून्यच आहे. अपवाद म्हणायला एखाद्या झाडावर दोन चार पक्षी बसतात पण तेथे राहत नाहीत. तसेच पर्याय कमी होत असल्याने कुठेकुठे मधमाशा गुलमोहरासारख्या एखाद्या झाडावर प्रसंगी दिसू शकतात.

कर्नाटक राज्य शासनाने निलगिरी झाडाची लागवड करण्यास बंदी घातलेली आहे. निलगिरीचे झाड जमिनीतील पाणी मोठ्या प्रमाणावर (जवळजवळ ९० लिटर दिवस) शोषून घेते. त्यामुळे हे झाड पाणी दुर्भिक्ष असलेल्या ठिकाणी लावून चालत नाही. पन्नास वर्षापूर्वी सोलापुरातील पंढरपूर, सांगोला भागातील माळरान जमिनीवर मेक्सिको येथील वेडी बाभूळ लावली. ती वेगाने वाढली आणि देशी बाभळीला तिने जवळजवळ नष्टच केले. आपल्याकडेही कमी कालावधीत वाढणारी देशी झाडे आहेत. उदाहरणार्थ काटेसावर, कांचन, शिरीष, हादगा, शेवगा, कदंब, सीतेचा अशोक, सुरंगी. याशिवाय वड, पिंपळ, कडुलिंब, चिंच, उंबर झाडे तर सदासर्वकाळ उत्कृष्ट होत, अशी देशी झाडे लावावीत.

माळरानावर झाडे लावणे

सर्वसामान्य समज असा की गवताळ व त्यावर विखुरलेली थोडीशीच झाडे, अशा परिसंस्थेपेक्षा भरपूर झाडे असलेल्या प्रदेशाचे महत्त्व अधिक आहे. आजची पर्यावरण चळवळ मुख्यत्वे यावरच अवलंबून आहे. परंतु दिसेल त्याठिकाणी वृक्षारोपण करणे योग्य नाही. शिवाय कोणतीही झाडे कुठेही लावणे चुकीचे असते. जमिनीचा प्रकार, पोत, हवामान पाहूनच झाडे लावावी लागतात. झाडे माळावर लावताना बऱ्यापैकी म्हणजे साधारण वीस मीटर अंतर ठेवावे लागते. झाडं लावायची असतील तर ती मेडशिंगी, बारतोंडी, काळा शिरीष इत्यादी लावावी. महत्त्वाचे म्हणजे ही सर्व झाडे हळूहळू वाढत असतात आणि आपल्याला तर भरकन परिसर हिरवागार झालेला पाहायचा असतो. त्यामुळे संयम हवा. प्रत्येक परिसंस्थेचे जैविक वैशिष्ट्यांमुळे जीवशास्त्रीय स्वरूप ठरलेले असते. माळराने (गवताळ परिसंस्था) वर्षभर हिरवीगार राहूच शकत नाहीत. आपण अट्टाहासाने जर माळावर सदाहरित वृक्षारोपण करु लागलो तर तेथील जैविक विविधतेवर निश्चितच परिणाम होतो. ती हळूहळू कमी होत जाणार हे नक्की. माळढोक पक्ष्याचे उदाहरण आपल्यासमोर आहे. माळरानावर केलेले ग्लिरिसिडियाचे वृक्षारोपण माळढोकचे तेथून जाण्याच्या अनेक कारणांपैकी एक प्रमुख मानले जाते. आता माळढोकच्या वाटेवर येथील धाविक, पखुर्डी, माळटिटवी याबरोबरच इतर प्राणीही कमी होऊ लागलेले आहेत. दुष्काळग्रस्त भागात जीवसृष्टी टिकून राहावी म्हणून माळरान परिसंस्था अस्तित्वात आलेली आहे, ती तशीच आपणाला जपली पाहिजे.

## वाचनाने बुद्धीमत्ता वाढते

आपल्या समाजात सध्या मुलांच्या करीयरवर पालकांची मोठी नजर असते. त्याला शालेय शिक्षणातून पिळून काढून जास्तीत जास्त मार्क मिळवण्यासाठी उद्युक्त करण्यावर पालकांचा भर असतो. पण ते करताना ही पालक मंडळी त्याने अभ्यासाशिवाय अन्य काहीही वाचू नये याबाबत दक्ष असतात. त्याच्या हातात एखादे गोष्टीचे पुस्तक दिसले की ते हिसकावून घेतात आणि असे फालतू वाचन करण्यात वेळ घालवण्यापेक्षा तेवढाच वेळ शाळेचा अभ्यास केला तर चार दोन मार्क जास्त पडतील असा उपदेशही करतात.

खरे तर असे फालतू वाचन हे फालतू नसते. जी मुले अवांतर वाचन जास्त करतात त्यांचाच अभ्यास पक्का असतो असा अनुभव आहे. कारण शाळेच्या पुस्तकाबाहेरचे काही काही वाचून त्याच्या मनात काही नवे शब्द आणि संकल्पना रुजतात आणि त्यामुळे त्याला कोणतीही नवी संकल्पना लवकर अवगत होते. ब्रिटनमधील एडिनबरो येथील मानसशास्त्रज्ञ स्टुअर्ट रिची यांनी हे संशोधन केले आहे.

आपल्या मुलाचा अभ्यास पक्का करायचा असेल तर तो शाळेतली पुस्तके वाचतो की नाही हे तर पहाच पण तो त्याशिवाय अन्य काही वाचत आहे की नाही यावरही लक्ष ठेवा असा सल्ला त्यांनी पालकांना दिला आहे. किंबहुना मुलाची वाचनाची क्षमता आणि त्याला किती लहान वयात वाचायला येत आहे यावर त्याची प्रगती ठरते असे म्हटले आहे. तेव्हा आता मुलाच्या हातात गोष्टीचे पुस्तक दिसले की ते हिसकावून घेऊ नका. त्यामुळेच त्याचा अभ्यास पक्का होणार आहे.

## फ्रूट ज्यूसही आरोग्याला हानीकारकच



फळांचा रस आरोग्यदायी असतो असा आपला ठाम समज आहे. मात्र आपल्या या समजाला धक्का देणारी बाब संशोधनातून नुकतीच समोर आली आहे. संशोधकांचे असे म्हणणे आहे की एक ग्लास कोलासारखे शीतपेय शरीराला जितके अपायकारक आहे, तितकाच १ ग्लास फ्रूट ज्यूसही आहे. संशोधक याबाबतचे स्पष्टीकरण देताना सांगतात, आख्खे फळ खाण्याऐजवी जर त्याचा रस काढला गेला तर त्यात फायबर रहात नाहीच पण ताज्या रसाला चव आणण्यासाठी वरून साखर घालावी लागते. म्हणजेच प्रत्यक्ष फळापेक्षा रसात साखरेचे प्रमाण जास्त होते. रस काढल्यामुळे फळांतील जीवनसत्त्वे कमी होतात. टेट्रा पॅक मधील फळाचा रस पॅक करण्यापूर्वी वर्षभर काढलेला आणि मोठ्या कंटेनरमध्ये ऑक्सिजन शिरू न देता साठविलेला असतो. या प्रोसेसमध्ये फळाचा खरा स्वाद नष्ट होतो व त्यामुळे रसाला चव आणण्यासाठी कृत्रिम फ्लेवर्स वापरले जातात.

फळांच्या रसांना आकर्षक रंग आणण्यासाठी व गोडी वाढविण्यासाठी वापरले जाणारे रंग व स्वीटनरमुळे रसाची पोषणमूल्ये कमी होतात. त्यापेक्षा आख्खे फळ अधिक पोषणमूल्ये देते. याचा अर्थ असाही आहे की कोणत्याही शीतपेयांपेक्षा अथवा फ्रूट ज्यूसपेक्षा साधे पाणीच अधिक आरोग्यदायी आहे. पण साधे पाणी पिणे फारसे आवडत नसेल तर?

तर त्यावरचा एक उपायही संशोधकांनी सुचविला आहे. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे एका बाटलीत लिंबू वर्गातील कोणतेही म्हणजे संत्रे, मुसुंबे असे फळ अर्धे कापून बाटलीच्या तळात बसवा आणि वरून साधे शुद्ध पाणी ओता. हे तयार झालेले पेय फ्रूट वॉटर आरोग्यदायी आहेच पण फळाचा खरा स्वाद, गोडी त्यामुळे कायम राहते आणि पोषणमूल्येही वाया जात नाहीत.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# प्रशिक्षणाच्या माध्यमातून निवडणूक कर्तव्य पार पाडणे सुलभ -जिल्हाधिकारी राऊत

## नांदेड उत्तर विधानसभा मतदारसंघात मतदान कर्मचाऱ्यांचे प्रथम प्रशिक्षण संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** प्रत्येक मतदान अधिकारी व कर्मचारी यांनी ''चुनाव का पर्व, देश का गर्व'' या भावनेने राष्ट्रीय कर्तव्य म्हणुन जबाबदारीने प्रशिक्षण घेणे आवश्यक आहे. प्रत्यक्ष मतदान केंद्रावरील येणा-या संभाव्य समस्यांबाबत सविस्तर सुचना देण्यात आल्या. या समस्यांचे निराकरण प्रशिक्षणाच्या माध्यमातून पूर्ण केल्यास निवडणूक पार पाडणे घेणे अधिक सुलभ होते, असे आवाहन जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी श्री अभिजीत राऊत यांनी प्रशिक्षणात केले.

नांदेड लोकसभा पोटनिवडणुक व विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ साठी १६-नांदेड विधानसभा मतदार संघाच्याअंतर्गत, ८६-नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघासाठी मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी-कर्मचारी यांचे प्रथम प्रशिक्षण, ईव्हीएम हाताळण्याचे प्रशिक्षणसह आज ग्यानमाता विद्याविहार विद्यालय कामठा रोड नांदेड येथे आयोजीत करण्यात आले होते. हे प्रशिक्षण एका सत्रात घेण्यात आले.



प्रशिक्षणाच्या सुरुवातीस जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी १६-नांदेड लोकसभा अभिजीत राऊत यांचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो) ललितकुमार व-हाडे यांनी स्वागत केले. त्यानंतर प्रत्यक्ष प्रशिक्षणास सुरुवात झाली.

सत्रात निवडणूक निर्णय अधिकारी तथा उप जिल्हाधिकारी (रोहयो) ललितकुमार व-हाडे यांनी विस्तृतपणे पॉवर-पॉईंट प्रेझेंटेशनच्या (सादरीकरणाच्या) माध्यमातून मतदान प्रक्रिया सुरु झाल्या पासून ते समाप्त होईपर्यंत ची कामे करण्याबाबत प्रशिक्षण दिले. यात इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्ही.व्ही.पॅट यंत्रासंबंधी महत्वपुर्ण माहिती देण्यात आली. निवडणूकीशी संबंधित विविध फॉर्म्स कसे भरतात, कोण-कोणत्या समस्या येवू शकतात व त्या समस्यांचे उपाय कोणते याबद्दल सविस्तर प्रशिक्षण देण्यात आले. सदरील प्रशिक्षण संवादात्मक व चर्चात्मक पध्दतीने घेण्यात आले. यावेळी प्रशिक्षण मंचावर विकास बिरादार व तहसिलदार प्रगती चोंडेकर, बालाजी सोनटक्के, इंद्रजित गरड, नायब तहसिलदार हे उपस्थित होते.

निवडणूक कार्यप्रणाली व मतदान केंद्रावरील कर्तव्ये, विविध फॉर्म, विविध प्रपत्रे, संवैधानिक व असंवैधानिक लिफाफ्या बाबतची सविस्तर माहिती देण्यात आली. इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र (एतच्) वापराबाबतची सुलभ प्रक्रीया चर्चेव्दारे समजावून सांगण्यात आली व प्रशिक्षणार्थींच्या प्रश्नांचे / शंकांचे निरसन करण्यात आले. सत्रातील पहिल्या टप्प्यात माहिती विषयक प्रशिक्षण दिले तर, दुस-या टप्प्यात प्रत्यक्ष ई.व्ही.एम. वापराचे प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणास सुमारे ९०० कर्मचारी उपस्थित होते.

प्रशिक्षणाच्या प्रत्येक सत्राच्या दुस-या टप्प्यात सर्व क्षेत्रिय अधिकारी आणि एतच् मास्टर ट्रेनर यांनी इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र व व्ही.व्ही.पॅट प्रत्यक्ष हाताळणी बाबतचे प्रशिक्षण उपस्थित कर्मचारी यांना देण्यांत आले. यामध्ये इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र जोडणी कशी केली जाते याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण देण्यात आले. सदर प्रशिक्षणात टपाली मतपत्रिकेव्दारे मतदान करण्यासाठी टपाली मतपत्रिकेची मागणी नोंदविण्या साठीचा नमुना १२ भरुन घेण्यात आला व टपाली मतपत्रिका प्राप्त करणेबाबत देखील सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. निवडणूक कर्तव्यावर राहून सूध्दा मतदान करता येईल ही जाणीव करून देण्यात आली.

या प्रशिक्षणाच्या ठिकाणी विविध कर्मचारी यांची उपस्थिती नोंदविण्यासाठी एकुण २० टेबलवर ४० कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. तसेच मतदार सहायता कक्ष, रुग्णवाहिकेसह वैद्यकीय पथक, नांदेड वाघाळा शहर महानगरपालीकेचे अग्निशमन दल, शहर वाहतूक शाखेचे वाहतूक पोलीस, यांना पाचारण करण्यात आले होते. सदर प्रशिक्षणाच्या ठिकाणी आवश्यक त्या मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या होत्या. या प्रशिक्षण सत्राचे सूत्रसंचालन श्री. विकास बिरादार, तहसिलदार व श्रीमती प्रगती चोंडेकर, तहसिलदार यांनी केले. प्रशिक्षण यशस्वी करण्यासाठी ८६-नांदेड उत्तर विधानसभा मतदार संघातील सर्व अधिकारी- कर्मचारी विशेष परिश्रम घेतले.

## संक्षिप्त...

### कळवा मुंब्रा विधानसभेत नजीब मुल्ला यांचे कार्यकर्त्यांचा मेळावा घेत शक्तिप्रदर्शन




दैनिक आपला विदर्भ

**ठाणे/प्रतिनिधी :** कळवा मुंब्रा विधानसभेमध्ये महायुतीचे राष्ट्रवादी दादा गटाचे नजीम मुल्ला यांना उमेदवारी जाहीर झाल्यानंतर आज प्रथमच कळवा मुंब्रा विधानसभेमध्ये महायुतीचा मेळावा पार पडला.. या मेळाव्याला खासदार श्रीकांत शिंदे यांनी ऑनलाईन स्वरूपात कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.. येणाऱ्या निवडणुकीत विजय हा आमचाच असेल सोमवारी मी उमेदवारी अर्ज भरणार आहे व अनेक नेते अनेक आमदार यावेळी उपस्थित राहतील तसेच फक्त कळवा मुंब्रा विधानसभेतील नागरिक उपस्थित असतील इतर कोणत्याही भागातील नागरिक उपस्थित नसणार अशा खोचक टीका यावेळी नजीब मुल्ला यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर लगावल्या आहेत एका मताने का होईना मात्र मी जिंकणार नक्कीच असा विश्र्वास यावेळी नजीब मुल्ला यांनी व्यक्त केला आहे.तर या मेळाव्यामध्ये उपस्थित असणाऱ्या राष्ट्रवादी दादा गटाचे ठाणे जिल्हा अध्यक्ष आनंद परांजपे यांनी आमदार जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका करत येणाऱ्या निवडणुकीमध्ये नजीब मुल्लाच विजयी होईल व २३ तारखेला दसऱ्याच्या दिवशी रावण सगळेच दहन करतील असे सांगत आनंद परांजपे यांनी जितेंद्र आव्हाड यांच्यावर टीका करत एक प्रकारे त्यांच्या समोर रणसंग्राम करत त्यांना पराभव करण्याचा इशारा दिला आहे.

### मोहम्मद शमीचा टीम इंडियातील प्रवास संपला? बीसीसीआयच्या या निर्णयामुळे उडाली खळबळ

नवी दिल्ली : टीम इंडिया सध्या न्यूझीलंडविरुद्ध कसोटी मालिका खेळत आहे. यानंतर भारतीय संघ आपली पुढील कसोटी मालिका ऑस्ट्रेलियाविरुद्ध खेळणार आहे. २२ नोव्हेंबरपासून खेळल्या जाणाऱ्या या मालिकेसाठी टीम इंडियाचा संघ जाहीर करण्यात आला आहे. मात्र आश्चर्याची बाब म्हणजे स्टार वेगवान गोलंदाज मोहम्मद शमी या दौऱ्यात संघाचा भाग असणार नाही. मोहम्मद शमी २०२३ च्या वनडे वर्ल्ड कपपासून टीम इंडियातून बाहेर आहे. स्पर्धेदरम्यान त्याला दुखापत झाली, त्यामुळे तो फेब्रुवारी २०२४ मध्ये लंडनला गेला आणि त्याच्यावर शस्त्रक्रिया झाली. या ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर तो पुनरागमन करू शकेल, असे मानले जात होते, मात्र तसे झाले नाही.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यासोबतच बीसीसीआयने दक्षिण आफ्रिका दौऱ्यासाठीही संघ जाहीर केला आहे, जिथे टी-२० मालिका खेळवली जाणार आहे. यादरम्यान बीसीसीआयने दुखापतीमुळे संघात न निवडलेल्या खेळाडूंबाबत एक वेगळे अपडेटही दिले आहे, ज्यात कुलदीप यादव, मयंक यादव, शिवम दुबे आणि रायन पराग या खेळाडूंचा समावेश आहे. पण बीसीसीआयने आपल्या प्रसिद्धीपत्रकात मोहम्मद शमीबाबत कोणतेही अपडेट दिलेले नाही, यामुळे सर्वांनाच आश्चर्याचा धक्का बसला आहे.

मोहम्मद शमीने नुकतेच एका कार्यक्रमादरम्यान त्याच्या दुखापतीबद्दल सांगितले होते की, त्याला आता कोणतीही दुखापत नाही आणि पुढील महिन्यात सुरू होणाऱ्या ऑस्ट्रेलिया दौऱ्यासाठी निवड होण्यासाठी त्याला दोन देशांतर्गत सामने खेळून फिटनेस सिद्ध करावे लागेल. मात्र बीसीसीआयने अचानक संघाची घोषणा करून सर्वांनाच हैराण केले आहे. इतकेच नाही तर फिटनेसच्या अधीन राहूनही शमीची निवड झाली नाही, याचा अर्थ मालिकेच्या मध्यभागीही त्याची एंट्री कठीण आहे.

आम्ही तुम्हाला सांगतो, अलीकडेच मोहम्मद शमी बंगळुरू कसोटीनंतर सहाय्यक प्रशिक्षक अभिषेक नायर याच्याकडे गोलंदाजी करताना दिसला होता. त्यानंतर तो पूर्ण रनअपसह गोलंदाजी करताना दिसला. त्याच वेळी, शमी अजूनही स्वतःला सतत सांगत आहे. त्यानंतरही त्यांची निवड का झाली नाही, हे समजण्यापलीकडचे आहे. शमीने बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीमध्ये एकूण ११ कसोटी सामने खेळले असून ४० विकेट्स त्याच्या नावावर आहेत. अशा परिस्थितीत टीम इंडियाला ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर मोहम्मद शमीसारख्या वेगवान गोलंदाजाची उणीव भासू शकते.

### 'तारक मेहता'चा जेठालाल दिवाळीपूर्वी करणार धमाका, चाहत्यांना देणार मोठे सरप्राईज

**मुंबई/प्रतिनिधी :** 'तारक मेहता का उल्टा चष्मा' हा एक अतिशय लोकप्रिय टेलिव्हिजन शो आहे, या शोचे चाहते खूप मोठे आहेत. त्याची लोकप्रियता आणखी वाढवण्यासाठी त्याच्या निर्मात्यांनी या शोचा एक गेम लॉन्च करण्याची योजना आखली आहे. या वर्षाच्या सुरुवातीला, 'तारक मेहता का उल्टा चष्मा'चा निर्माता असित कुमारने टीव्ही शोच्या पात्रांवर आधारित गेम लॉन्च करण्याची घोषणा केली होती.

मार्च २०२४ पर्यंत, सुमारे ८ गेम लॉन्च केले गेले होते, त्यानंतर आणखी ११ गेम लॉन्च केले जातील असे सांगण्यात आले होते. नुकताच त्याचा एक गेम, 'जेठालाल गडा' या व्यक्तिरेखेवर आधारित 'गडा इलेक्ट्रॉनिक्स' लॉन्च होणार आहे. नीला फिल्म्सची गेमिंग शाखा, नीला मीडियाटेकचा नवीन गेम 'गडा इलेक्ट्रॉनिक्स' धनत्रयोदशीच्या मुहूर्तावर म्हणजेच २९ ऑक्टोबर रोजी लॉंच होणार आहे. शो मेकर असित कुमार मोदी यांनी सोशल मीडियावरून ही माहिती दिली आहे. शोच्या निर्मात्याने अधिकृत खात्यावर एक व्हिडिओ पोस्ट केला आहे, ज्यामध्ये त्याने सांगितले की तारक मेहताच्या दर्शकांसाठी तो एक चांगली बातमी घेऊन आला आहे. ते म्हणाले, ''तारक मेहताच्या रसिक प्रेक्षकांसाठी आज एक आनंदाची बातमी आहे, धनत्रयोदशीच्या दिवशी एक गेम लॉन्च होत आहे. या गेममध्ये जेठालाल, नट्टू काका, बागा आणि मगन या पात्रांचा समावेश असेल, जो खूप मजेदार असणार आहे.

## जॅकी श्रॉफ यांनी प्राण्यांसाठी केला त्यांना विशेष आवडलेल्या गोष्टीचा त्याग

**मुंबई/प्रतिनिधी :** ६७ वर्षीय ज्येष्ठ अभिनेते जॅकी श्रॉफ अजूनही चित्रपटांमध्ये सक्रिय आहेत. जॅकी श्रॉफ यंदाच्या दिवाळीत 'सिंघम अगेन' या मोठ्या चित्रपटात दिसणार आहे. जग्गू दादाने केवळ हिरो बनूनच नाही, तर खलनायक बनूनही सर्वांची मने जिंकली आहेत. अजय देवगणच्या 'सिंघम अगेन'मध्ये जॅकी खलनायकाच्या भूमिकेत दिसणार आहे. अभिनेता त्याच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल क्वचितच बोलतो, परंतु त्यांचे प्राण्यांवर इतके प्रेम आहे की त्यांनी त्यांची आवडती व्हॅन देखील दान केली.

जॅकी श्रॉफ यांचा 'तेरी मेहेरबनियां' हा चित्रपट ३९ वर्षांपूर्वी प्रदर्शित झाला होता. या चित्रपटात एका कुत्र्याची महत्त्वाची भूमिका होती, त्याचे नाव मोती होते. चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान जग्गू दादांना मोती खूप आवडायाचा. त्या काळात शूटिंगच्या वेळी कलाकार त्यांच्या आवडत्या व्हॅनमध्ये आराम करत असत. त्यांना ती व्हॅन एवढी आवडली की, त्यांनी कुणालाही आत जाऊ दिले नाही. पण मोतीशी संलग्न झाल्यानंतर ते त्याला व्हॅनमध्ये आराम करू द्यायचा. ते आणि मोती यांच्याशिवाय त्या व्हॅनमध्ये कुणालाही बसण्याची परवानगी नव्हती.त्या व्हॅनशी जॅकी श्रॉफचेही भावनिक नाते होते. शूटिंगदरम्यान ते नेहमी हीच व्हॅन वापरत असे. अभिनेत्याला ती व्हॅन खूप आवडली आणि त्यांनी तिची खूप काळजी घेतली, पण आयशा जुल्काने ती व्हॅन जग्गू दादाकडून जनावरांच्या मदतीसाठी उधार घेतली होती आणि त्यांनी ती तिला दिली. आयशा जुल्काने स्वतः टाईम्स ऑफ इंडियाला दिलेल्या मुलाखतीत सांगितले होते की, तिला जॅकी श्रॉफची व्हॅन प्राण्यांसाठी ॲम्ब्युलन्स बनवायची आहे. आजोबांचे आपल्या व्हॅनवर किती प्रेम आहे, हे तिलाही माहीत होते.

## बर्निंग बसचा थरार! धावत्या बसने अचानक घेतला पेट; पुणे-बंगळुरू महामार्गावरील थरारक घटना



दैनिक आपला विदर्भ

**कोल्हापूर/प्रतिनिधी :** बेळगावहून पुण्याला निघालेल्या एका खासगी प्रवासी बसला अचानक आग लागल्याची धक्कादायक घटना घडलीय. या घटनेत एका प्रवाशाचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली आहे. पुणे-बंगळुरू महामार्गावर कोल्हापुरातील गोकुळ शिरगाव ते उजळाईवाडीदरम्यान शुक्रवारी मध्यरात्री १ वाजेच्या सुमारास हा 'बर्निंग बस'चा थरार घडला. या घटनेची नोंद गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

नेमकं काय घडलं? : खासगी कंपनीची प्रवासी बस बेळगावहून रात्री नऊ वाजेच्या सुमारास निघाली होती. सुमारे ३० प्रवासी असलेली ही बस गोकुळ शिरगाव येथील मयूर पेट्रोल पंपाजवळ आल्यानंतर अचानक इंजिननं पेट घेतला. इंजिनला आग लागल्याचं पाहताच चालक आणि वाहकानं घटनास्थळावरुन पलायन केलं. बसमधील प्रवासी गडबडीनं खाली उतरले. मात्र, एक प्रवासी झोपेत असल्यानं तो बसमध्येच अडकला. त्यामुळं आगीत होरपळून त्याचा मृत्यू झाला. काही वेळातच संपूर्ण बसनं पेट घेतला. बघता बघता आगीनं रौद्ररुप धारण केलं. घटनेची माहिती मिळताच स्थानिक नागरिकांसह गोकुळ शिरगाव पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेऊन अग्निशमन दलाला पाचारण केलं. कोल्हापूर मनपाच्या अग्निशमन दलानं ही आग आटोक्यात आणली. दरम्यान, अचानक घडलेल्या या दुर्घटनेमुळं राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक काही तास खोळंबली होती.

बस चालक आणि वाहक पसार : इंजिनमध्ये बिघाड झाल्यामुळं आग लागल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी व्यक्त केलाय. गोकुळ शिरगाव पोलीस ठाण्याचे दिगंबर गायकवाड यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याच्या सूचना दिल्यात. तर सध्या पोलीस चालक आणि वाहकाचा शोध घेत आहेत.

## ऋतुराज गायकवाडला मिळाले नाही टीम इंडियात स्थान? बीसीसीआयवर राजकारण केल्याचा आरोप

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** बीसीसीआयने शुक्रवार २५ ऑक्टोबर रोजी २२ नोव्हेंबरपासून सुरू होणाऱ्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी १८ सदस्यीय भारतीय संघाची घोषणा केली. याशिवाय, ८ नोव्हेंबरपासून दक्षिण आफ्रिकेविरुद्ध खेळल्या जाणाऱ्या ४ सामन्यांच्या टी-२० मालिकेसाठीही बोर्डाने संघाची घोषणा केली आहे. या मालिकेसाठी १५ खेळाडूंची निवड करण्यात आली आहे. या दोन्ही संघांमध्ये ऋतुराज गायकवाड याचे नाव नाही. त्याला दोन्ही दौऱ्यांमधून बाहेर पाहिल्यानंतर काही चाहते संतापले आहे. त्यांचा राग बीसीसीआयवर भडकला. चाहत्यांनी त्यांच्यावर पक्षपात आणि राजकारणाचा आरोप केला आणि तो चेन्नई सुपर किंग्जकडून खेळत असल्यामुळे त्याच्यावर अन्याय होत असल्याचे म्हटले.

ऋतुराज गायकवाडला बॉर्डर-गावस्कर करंडक स्पर्धेत स्थान मिळालेले नाही. मात्र, मालिका सुरू होण्यापूर्वी ऑस्ट्रेलिया अ संघाविरुद्धच्या दोन सराव सामन्यांसाठी त्याच्याकडे टीम इंडियाची कमान सोपवण्यात आली आहे. गायकवाडने अलीकडेच दुलीप ट्रॉफी आणि इराणी चषक स्पर्धेत कर्णधारपद भूषवले होते. दुलीप ट्रॉफीमध्ये त्याचा संघ दुसऱ्या क्रमांकावर राहिला. इराणी चषक स्पर्धेत मुंबईकडून पराभव स्वीकारावा लागला. या काळात त्याने काही चांगल्या खेळी खेळल्या.

यानंतर, त्याने दोन रणजी ट्रॉफी सामन्यांमध्ये २३१ धावा केल्या, ज्यात मुंबईविरुद्ध १४५ धावांचा समावेश होता. त्याचा फॉर्म आणि कामगिरी पाहून चाहते त्याच्या संघात निवडीची मागणी करत आहेत. मात्र संघात स्थान न मिळाल्याने त्यांनी बीसीसीआयवर राजकारण केल्याचा आरोप केला. आयपीएलमध्ये सीएसकेकडून खेळल्यामुळे त्याची निवड होत नसल्याचेही अनेक चाहत्यांनी सांगितले.

ऋतुराज गायकवाडने देशांतर्गत खेळांमध्ये सलामी दिली. दुलीप ट्रॉफी, इराणी चषक आणि रणजी ट्रॉफी यांसारख्या स्पर्धांमध्येही त्याने चांगली फलंदाजी केली आहे. टीम इंडियाकडून खेळतानाही त्याची कामगिरी जबरदस्त राहिली आहे. असे असूनही त्याच्या जागी अभिमन्यू ईश्वरनची बॅकअप सलामीवीर म्हणून निवड करण्यात आली आहे. पण दोन्ही खेळाडूंची आकडेवारी पाहता बीसीसीआयचा निर्णय योग्य असल्याचे दिसून येते. वास्तविक, गायकवाडने ३५ प्रथम श्रेणी सामन्यांमध्ये ४४ च्या सरासरीने २५१३ धावा केल्या आहेत, ज्यात ७ शतके आणि १३ अर्धशतकांचा समावेश आहे.

अभिमन्यू इसवरनने ९९ प्रथम श्रेणी सामने खेळले आहेत, याचा अर्थ त्याच्याकडे अधिक अनुभव आहे. त्याने ४९ च्या सरासरीने ७६३८ धावा केल्या आहेत ज्यात २७ शतके आणि २९ अर्धशतकांचा समावेश आहे. दोघांच्या कामगिरीत आणि अनुभवातील फरक स्पष्टपणे दिसून येतो. अशा स्थितीत ईश्वरन याची जागा गायकवाड याच्यापुढे आहे, असे म्हणता येईल. आता दक्षिण आफ्रिका दौऱ्याबद्दल बोलूया. भारतीय संघाला ८ ते १५ नोव्हेंबर या कालावधीत टी-२० मालिका खेळायची आहे, तर गायकवाड सध्या ऑस्ट्रेलियाला रवाना झाला असून त्याला १ डिसेंबरपर्यंत तिथे राहायचे आहे. अशा परिस्थितीत त्याला दक्षिण आफ्रिकेत जाणे शक्य नाही.

## राज्यस्तरीय शालेय वुशू क्रीडा स्पर्धेचे शानदार उद्घाटन

दैनिक आपला विदर्भ

**नांदेड/प्रतिनिधी :** आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, व जिल्हा क्रीडा परिषद, नांदेड संयुक्त विद्यमाने व ऑल महाराष्ट्र वुश असोसिएशन व नांदेड जिल्हा वुशू असोसिएशन यांचे सहकार्याने राज्यस्तरीय शालेय वुशू (१७ व १९ वर्षे मुले-मुली) क्रीडा स्पर्धा सन २०२४-२५ चे आयोजन २५ ते २७ ऑक्टोंबर, २०२४ या कालावधीत जिल्हा क्रीडा संकुल, इनडोअर हॉल, नांदेड येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेचे उदघाटन डॉ. हंसराज वैद्य (अध्यक्ष, नांदेड जिल्हा वुशू असो.) यांचे अध्यक्षतेखाली व सोपानजी कटके (सचिव, ऑल महाराष्ट्र वुशू असो.), यांचे हस्ते आज संपन्न झाला.

या कार्यक्रमासाठी श्रीमती ॲड. अर्चना जांभळे (विधी तज्ञ), जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे , एपीआय दिगंबर कांबळे, क्रीडा अधिकारी लातूर उपसंचालक कार्यालयचे डी.व्ही. गडपल्लेवार , राजेश जांभळे (सचिव, नांदेड जिल्हा वुशू असो.) श्रीमती प्रतिक्षा शिंदे (शिवछत्रपती पुरस्कारार्थी), सुरज सोनकांबळे (शिवछत्रपती पुरस्कारार्थी), डॉ. पचलिंगे (वैद्यकीय अधिकारी), अविनाश पाटील (जिल्हा सचिव कोल्हापूर), अमित म्हात्रे (जिल्हा सचिव, ठाणे), दिनेश माळी (जिल्हा सचिव, मुंबई) आदी मान्यवर उपस्थित होते. या स्पर्धेकरीता महाराष्ट्र राज्यातील ०८ विभागातून खेळाडू मुले-मुली, निवडसमिती सदस्य, पंच, सामनाधिकारी व स्वयंसेवक उपस्थित झालेले आहेत. मुले खेळाडूंची निवास व्यवस्था गुरुग्रंथ साहिब भवन, यात्री निवास, गुरुद्वारा परिसर, नांदेड येथे तर सर्व खेळाडूंची भोजनाची व मुलींची निवास व्यवस्था जिल्हा क्रीडा संकुल क्रीडा वसतिगृहात करण्यात आली आहे.




या स्पर्धेकरीता पंच म्हणून अविनाश पाटील (कोल्हापूर), लक्ष्मण उदमले (अहिल्यानगर), महेश इंदापुरे (छ.संभाजीनगर), निलेश राऊत (वर्धा), श्रीमती प्रतिक्षा शिंदे (पुणे), विजय खंडार (अमरावती), प्रफल्ल करंजीकर (पुणे), श्रीमती तृप्ती चांदवडकर (पुणे), अभिषेक सोनवणे (वर्धा), गणेश कुटटे (परभणी), सुरज सोनकांबळे (शिवछत्रपती पुरस्कारार्थी, नांदेड), संदिप शेलार (शिवछत्रपती पुरस्कारार्थी, मुंबई), अमिर शेख (लातूर), कृष्णा सुरवसे (परभणी), प्रकाश ग्यानोबा वाघमारे (व्य. लिपीक), दिपक बिसेन (नागपूर), बंटी राठोड (छ. संभाजीनगर), गणेश साकुरे (भंडारा), सददा सय्यद (छ. संभाजीनगर), अनिल खराडे (बीड), राज वासवंड (पुणे), अतुल जाधव (जळगांव), प्रणव वाघमारे (नांदेड), अक्षय जांभळे (नांदेड), अजय नवघडे (नांदेड), माधव शेरीकर (सोलापूर), दिनेश सोनवणे (जळगांव), प्रणव विटणकर (वर्धा), रोहीत राऊत (पुणे), सुमित खरात (छ. संभाजीनगर), सौरभ पाटील (कोल्हापूर), पियुष ढोणे (मुंबई शहर), शोऐब शेख (मुंबई शहर), साहिल भंडारी (ठाणे), दिनेश माळी (मुंबई उपनगर), संकेत गायकवाड (पनवेल शहर) आदींची नियुक्ती करण्यात आली आहे.

ही स्पर्धा यशस्वी करणेसाठी जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांचे मार्गदर्शनाखाली राहुल श्रीरामवार (क्रीडा अधिकारी तथा कार्यासन), क्रीडा अधिकारी संजय बेतीवार, राज्य क्रीडा मार्गदर्शक बालाजी शिरसीकर, चंद्रप्रकाश होनवडजकर (राज्य क्रीडा मार्गदर्शक तथा कार्यासन), श्रीमती शिवकांता देशमुख, वरिष्ठ लिपीक संतोष कनकावार, कनिष्ठ लिपीक दत्तकुमार धुतडे, व्यवस्थापक संजय चव्हाण, आनंद जोंधळे, हनमंत नरवाडे, आकाश भोरे, मोहन पवार, सुभाष धोंगडे, शेख इकरम, विद्यानंद भालेराव, चंद्रकांत गव्हाणे, सोनबा ओव्हाळ, यश कांबळे व आर्चरी असोसिएशनचे पदाधिकारी व खेळाडू आदिनी सहकार्य करीत आहेत.

ही स्पर्धा जिल्हा क्रीडा संकुल इनडोअर हॉल, नांदेड येथे आयोजीत करण्यात आले असून या स्पर्धेचा जास्तीत जास्त खेळाडू, क्रीडाप्रेमी, रसिक यांनी आनंद घ्यावा, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार टेंभरे यांनी केले आहे.

# उबाठा नेते सिद्धार्थ खरात सोमवारी दाखल करणार उमेदवारी अर्ज

## महाविकास आघाडीच्या कार्यकर्ते व पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न







दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर–लोणार विधानसभा मतदारसंघाचे उबाठा उमेदवार सिद्धार्थ खरात सोमवारी दि.२८ ऑक्टोबर रोजी उमेदवारी अर्ज दाखल करणार आहेत. त्या अनुषंगाने मेहकर आणि लोणार मधील महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांची आज दि.२६ ऑक्टोबर नियोजन बैठक पार पडली.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस शाम उमाळकर हे होते. तसेच बैठकीला शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख प्रा. नरेंद्र खेडेकर, राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हाध्यक्षा, माजी आ. रेखा खेडेकर, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष साहेबराव सरदार, ड. अनंत वानखेडे, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रा. आशिष रहाटे, उपजिल्हाप्रमुख संजीवनी वाघ, शिवसेना जिल्हाप्रमुख महिला आघाडी विजया पाटील, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस आफताब खान, काँग्रेस जिल्हा सरचिटणीस करिम खान, माजी नगराध्यक्ष मेहकर विलास चणखोरे, माजी नगरसेवक लोणार भुषण मापारी, माजी नगरसेवक मेहकर अशोक अडेलकर, लोणार काँग्रेस तालुकाध्यक्ष राजेश मापारी, शिवसेना तालुकाप्रमुख निंबाजी पांडव, शहराध्यक्ष पंकज हजारी, राष्ट्रवादी काँग्रेस लोणार तालुकाध्यक्ष संदीप मापारी, काँग्रेस शहराध्यक्ष शैलेश बावस्कर, जिल्हा परिषद सदस्य संजय वडतकर, शिवसेना शहर प्रमुख चिखली कल्पना बोधेकर, केशरबाई शिंदे, शिवसेना मेहकर शहरप्रमुख किशोर भाऊ गारोळे, युवासेना तालुकाप्रमुख ड. आकाश घोडे, युवासेना शहरप्रमुख ऋषिकेश जगताप, ड. संदीप गवई, बापु देशमुख ही नेतेमंडळी तसेच महविकास आघाडीचे सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी उपस्थित मान्यवरांनी मनोगत व्यक्त केले आणि मार्गदर्शन देखील केले.

त्याचबरोबर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्याकडून होईल ती मदत करण्याचे आश्र्वासन त्यांनी मला दिले. मेहकर आणि लोणारच्या विकासासाठी येणाऱ्या काळात आपण सर्वजण असंच एकजुटीने काम करू, आणि एका निष्ठावान शिवसैनिकाला निवडून आणू असा संकल्प महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केला आहे. तसेच येत्या सोमवारी दि.२८ ऑक्टोबर २०२४ रोजी स्वतंत्र मैदान, मेहकर येथे सभा घेऊन उमेदवारी अर्ज दाखल करण्यात येणार.तरी मेहकर आणि लोणारच्या जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन. याप्रसंगी उपस्थित असणाऱ्या सर्व नेतेमंडळींनी आपली मते मांडली आणि मार्गदर्शन देखील केले, त्याचबरोबर येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत त्यांच्याकडून होईल ती मदत करण्याचे आश्वासन त्यांनी मला दिले. मेहकर आणि लोणारच्या विकासासाठी येणाऱ्या काळात आपण सर्वजण असंच एकजुटीने काम करू, आणि एका निष्ठावान शिवसैनिकाला निवडून आणू असा संकल्प महाविकास आघाडीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी केला आहे. त्यासाठी सर्वप्रथम मी सर्वांचे मनापासून आभार मानतो.

> रेखाताई खेडेकर यांनी बोलताना म्हटले की श्याम भाऊ आपण एवढ्या निवडणुका लढल्या पाच सहा वेळेस एवढं चांगलं नियोजन करता तरीसुद्धा आपण कुठेतरी कमी का पडतो याचे सुद्धा चिंतन करून यातील त्रुटी असेल ती दूर करण्याचा प्रयत्न आता आपल्याला करावा लागेल कारण की आता सिद्धार्थ खरात हे एक सक्षम उमेदवार लाभलेले आहेत. त्यांना ज्ञान आहे अनुभव आहे काम कसं करायचं हे सुद्धा माहित आहे कुठल्याही गोष्टींत ते कमी पडतील अशी कमतरता नसून असा सक्षम उमेदवार म्हणून आता लाभलेला आहे तरी आपण सर्वांनी मन पक्क करून आपला हा उमेदवार कसा निवडून येईल यासाठी प्रयत्नशील पराकाष्ठा करावी.
>
> **–राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा अध्यक्षा. मा.आ. रेखाताई खेडेकर.**

> महाराष्ट्रातील गद्दारकीचे सर्वात मोठे ठिकाण हे उगवस्थान हे मेहकर आहे खासदार हा त्या गद्दारांचा नेतृत्व करत होता दुर्दैव आपलं आम्ही मातोश्रीला शब्द दिला होता याला पाडू परंतु आपण त्याला पराभूत करू शकलो नाही. पुन्हा त्यांचा मानसपुत्र म्हणतात तो आता आमदारकीसाठी उभा आहे याला पराभूत करणं ही आता आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. त्यासाठी नियोजन करावे लागेल त्याची सुरुवातच आता उद्यापासून आहे. अगोदर बोलल्या गेलं मागच्या वेळेस लोकसभेला २७३ मतांनी मी माघ आलो मला त्याचं काही दुःख नाही. पण आपण जे मागं राहलो खासदारापेक्षा मात्र आपल्या पाठीमागे सुद्धा दीड दोनशे मतांनी मागे राहिलं जे. मला काही त्याच्याबद्दल बोलायचं नव्हतं. मात्र भावनेच्या भरामध्ये अनेक लोक पाण्याकडे गेले ते जवळपास नेट फाईट झाली. आजही पाना म्हणा पाण्यासारखा दुसरा काही ताना मना कोणीतरी काना म्हणा. कुणीतरी तिरपा म्हणा उभा राहील मात्र महाविकास आघाडीने सिद्धार्थ खरात यांच्या पाठीमागे भक्कमपणे उभे राहावे आणि त्यांना विजय करायचा निर्धार ठेवावे.
>
> **–प्रा. नरेंद्र खेडेकर**

## विविध वृत्त...

### विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४; मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहिर केला आहे. कार्यक्रमानुसार मतदान दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी होणार आहे. मतदारांना मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सुट्टी जाहीर केली आहे. त्याअनुषंगाने विविध आस्थापनांनी आपल्या कामगार, अधिकारी व कर्मचाऱ्यांना सवेतन सुट्टी द्यावी, असे आवाहन जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे.

भारत निवडणूक आयोगाच्या सुचनेनुसार उद्योग विभागाने याबाबत परिपत्रक जारी केले आहे. विधानसभा निवडणुकीत मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी राज्य शासनाने अधिसूचनेद्वारे दिनांक २० नोव्हेंबर २०२४ या मतदानाच्या दिवशी सर्व विधानसभा मतदारसंघातील मतदान करण्याचा अधिकार असलेल्या प्रत्येक व्यक्तीला सुट्टी दिली जाईल. उद्योग विभागात येणा–या सर्व उद्योग समूह, महामंडळे, मंडळे, कंपन्या व संस्था, औद्योगिक उपक्रम आदींनाही ही सुट्टी लागू राहील. या सुट्टीच्या कारणास्तव व्यक्तीचे वेतनात कपात केली जाणार नाही.

अपवादात्मक परिस्थितीत कामगार, अधिकारी, कर्मचारी यांना पूर्ण दिवसाची सुट्टी देणे शक्य नसेल तर कमीत कमी दोन तासांची सवलत द्यावी मात्र, त्याबाबत जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिका–यांची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. मतदानासाठी सुट्टी अथवा सवलत न मिळाल्याने मतदान करता येणे शक्य झाले नाही अशी तक्रार मतदाराकडून झाल्यास आस्थापनांवर कारवाई करण्यात येईल, असाही इशारा देण्यात आला आहे.

### खडकवासल्यात शरद पवार गटाचा उमेदवार ठरला, पहिल्या यादीत नाव जाहीर केलं नाही कारण...

**खडकवासला/प्रतिनिधी** : गेल्या अनेक दिवसांपासून चर्चेत असलेल्या खडकवासला मतदारसंघात शरद पवार गटाचा उमेदवार कोण असणार, या प्रश्नाचे उत्तर मिळाले असून पक्षाने सचिन दोडके यांना पुन्हा संधी दिली आहे. सचिन दोडके यांना शनिवारी एबी फॉर्मही मिळाला आहे. भाजपचे आमदार भीमराव तापकीर यांच्याविरोधात गेल्यावेळी सचिन दोडके यांचा निसटता पराभव झाला होता.

मी येतोय अशा आशयाचे बॅनर सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. त्यांच्या संदेशाने खडकवासल्यात पुन्हा सचिन दोडके हेच निवडणुकीच्या रिंगणात असणार, हे जवळपास स्पष्ट झाले आहे. खडकवासल्यात लढण्यासाठी पक्षातीर इतरही इच्छुक होते.

सुप्रिया सुळे यांनी दोन दिवसांपूर्वी खडकवासला मतदारसंघाची बैठक घेतली होती. सचिन दोडके यांना पक्षाने संधी द्यावी, अशी मागणी अनेक पदाधिकाऱ्यांनी केली. त्यांची मागणी लक्षात घेऊन तसेच निवडून येण्याची क्षमता विचारात घेता सुप्रिया सुळे यांनी जयंत पाटील आणि शरद पवार यांच्याशी चर्चा करून संधी देण्याची मागणी केली.

राष्ट्रवादीत फूट पडल्यानंतर सचिन दोडके हे पक्षासोबत एकनिष्ठ राहिले. गत पंचवार्षिकला पराभव झालेला असला तरीही मतदारसंघात सक्रीय राहून काम करत राहिले. दोडके यांच्यात पक्षसंघटना बांधणीचे कौशल्य आहे. मतदारसंघात त्यांच्याकडे कार्यकर्त्यांचे जाळे आहे. त्यामुळे त्यांच्याच नावावर शिक्कामोर्तब करण्यात आल्याची माहिती आहे.

सचिन दोडके यांचे पवार गटाच्या पहिल्याच उमेदवारी यादीत ३६ नंबरला नाव होते पण पक्षातील इतर इच्छुकही जयंत पाटील यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत हजर होते.

# भैय्यासाहेब पाटील यांना मनसे कडून उमेदवारी

दैनिक आपला विदर्भ




**मेहकर/प्रतिनिधी** : मेहकर विधानसभा मतदारसंघासाठी शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी लढत होत असतानाच महाराष्ट्र नवनिर्माण सेनेकडून मेहकर लोणार विधानसभा मतदारसंघासाठी मेहकर येथील भैय्यासाहेब पाटील यांना आज दि.२६ ऑक्टोबर रोजी उमेदवारी जाहीर केली आहे. यावेळेस पहिल्यांदाच मनसेने उमेदवार दिल्याने मेहकर मतदारसंघातील राजकीय चित्र मात्र बदलण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मेहकर लोणार हा मतदारसंघ (एससी) राखीव आहे. या मतदारसंघात शिवसेना, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस अशा सर्वच पक्षाच्या उमेदवारांनी या अगोदर आपले नशीब आजमावले आहे. तर, या वेळेस महायुती महाविकास आघाडी अशी सरळ लढतीचे चित्र असतानाच मेहकर मतदारसंघात आता महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मेहकर येथील जागा लढवण्याचा निर्णय घेत येथील भैय्यासाहेब पाटील यांना उमेदवारी देऊन निवडणुकीत रंगत आणली आहे. मनसेच्या उमेदवारांनी विधानसभा निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतल्याने राजकीय गणिते बिघडण्याची शक्यता वर्तवली जात आहे. मनसेने मेहकर लोणार मतदार संघात पहिल्यांदाच उमेदवारी देत प्रस्थापितांसमोर आव्हान उभे केले आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भैय्यासाहेब पाटील यांना उमेदवारी देत त्यांना जिल्हाध्यक्ष लक्ष्मण जाधव यांनी केलेल्या कार्यावर विश्र्वास ठेवून भैय्यासाहेब पाटील यांना उमेदवारी तर भैय्यासाहेब पाटील यांना एबी फॉर्म सुद्धा दिल्याची माहिती आहे. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या एन्ट्रीने मतदार संघातील निवडणुकीची रंगत आणखीच वाढली आहे.

# शेतकऱ्यांशी नाळ जोडणाऱ्या उमेदवारांशी आम्ही सपोर्ट करू : रविकांत तुपकर

## महाविकास आघाडीने शब्द फिरविला




दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : महाविकास आघाडी सोबत क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे सकारात्मक बोलणे झाले होते. बुलढाण्याच्या जागेसंदर्भात सुद्धा चर्चा झाली होती. मात्र नंतर त्यांनी शब्द फिरविला.त्यामुळे आम्ही आता स्वतंत्र भूमिका घेतली असून अनेक ठिकाणी अपक्ष लढणार आहे. ज्या ठिकाणी अपक्ष लढणार नाही, त्या ठिकाणी शेतकऱ्याची नाळ जोडलेल्या उमेदवाराला आम्ही सपोर्ट करू आणि शेतकऱ्यांची ताकद दाखवून देऊ अशी संतप्त प्रतिक्रिया क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी देत महाविकास आघाडीवर रोष व्यक्त केला. महाविकास आघाडीतील सकारात्मक चर्चा फिस्कटल्यानंतर रविकांत तुपकर हे प्रसारमाध्यमांशी बोलत होते. यावेळी ते पुढे म्हणाले की, महाविकास आघाडीशी सकारात्मक बोलणी झाली होती. बुलढाण्याची जागा देण्याचा सुद्धा निर्णय झाला होता. मात्र ऐन वेळेवर त्यांनी त्यांचे शब्द फिरवले आहेत. आम्हाला महाविकास आघाडीने सन्मानाने घेतले नाही तर आम्ही फडफडत जाणार नाही, हा निर्णय आम्ही बैठकीत घेतला आहे.तसेच अपक्ष लढण्याच्या निर्णयावर सुद्धा एकमत झाले आहे. ज्या ठिकाणी आमचा उमेदवार राहणार नाही, त्या ठिकाणी शेतकऱ्याची नाळ जोडलेला जनतेमध्ये ज्या उमेदवाराबद्दल चांगली भावना आहे. शेतकऱ्यांच्या समस्यांची जाण आहे, अशा उमेदवाराला आम्ही सहकार्य करू आणि क्रांतिकारी शेतकरी संघटनेची ताकद दाखवून देऊ, ज्या मतदारसंघात उमेदवार नसेल त्या ठिकाणी स्थानिक पदाधिकारी व कार्यकर्त्यासोबत चर्चा करून करंट कार्यक्रम लावू, असा इशाराही रविकांत तुपकर यांनी दिला.सध्या आमची सामाजिक संघटना आहे. राजकीय पक्ष नाही, त्यामुळे आम्हाला सामाजिक संघटनेच्या नावावरच उभे राहावे लागणार आहे. सुरुवातीला अनेक संघटना ह्या सामाजिक होत्या. नंतर राजकीय पक्ष झालक. संघटना मोठी होण्यासाठी राजकीय बळ मिळणे आवश्यक आहे. बुलढाणा मतदारसंघात मी स्वतः उभे राहणार की नाही याबाबत २९ ऑक्टोबर पर्यंत निर्णय घेऊ त्यानंतर संघटनेची भूमिका स्पष्ट करू आणि महाविकास आघाडीला शेतकऱ्यांची ताकद दाखवून देऊ, असे असा इशाराही क्रांतिकारी शेतकरी संघटनेचे अध्यक्ष रविकांत तुपकर यांनी दिला.

# युजीसी नेट परिक्षेत कु.दिपाली गवई हिचे सुयश सहाय्यक प्राध्यापक व पीएचडीसाठी पात्र

दैनिक आपला विदर्भ

**वाशिम/प्रतिनिधी** :कारंजा तालुक्यातील धनज (बु) या गावातील कु.दिपाली राजेंद्र गवई हिने युजीसी नेट परिक्षेत या विषयात ९४% गुण मिळवून सुयश संपादन केले आहे.ती सहाय्यक प्राध्यापक व पीएचडीसाठी पात्र ठरली आहे. राष्ट्रीय पात्रता परीक्षा(नेट) ज्याला यूजीसी नेट(णऋड–छएढ) किंवा एनटीए–यूजीसी–नेट(NTA-UGC-NET) म्हणून ओळखले जाते. ही विद्यापीठे आणि महाविद्यालयांमध्ये सहाय्यक प्राध्यापक आणि / किंवा कनिष्ठ संशोधन फेलोशिप (जेआरएफ) मिळवण्यासाठी पात्रता निश्र्चित करण्यासाठीची चाचणी आहे. यूजीसी नेट ही सर्वात कठीण परीक्षांपैकी एक मानली जाते विद्यापीठ आणि सरकारी महाविद्यालयांसाठी नेटची पात्रता अनिवार्य आहे.ही परिक्षा मे २०२४ मध्ये घेण्यात आली होती. तिच्या या यशानंतर तिचे व गवई परिवाराचे सर्वस्तरातून अभिनंदन व कौतुक होत आहे. दिपालीचे प्राथमिक शिक्षण जि.प.मराठी शाळा व माध्यमिक शिक्षण येथील एम.बी. हायस्कूल धनज (बु), बी.एस. सी.पदवी युवाशक्ती कॉलेज अमरावती,एम ए मराठी जे.डी. पाटील महाविद्यालय बडनेरा व डीएड राष्ट्रमाता जिजाऊ अध्यापक विद्यालय बडनेरा येथे झाले. नेट (NET) परीक्षेसाठी तिने



जे.डी.पाटील महाविद्यालयाचे प्रा.कोकणे यांचे मार्गदर्शन घेतले. जिल्हा माहिती कार्यालय वाशिम येथे कार्यरत अनिल कुरकुटे तसेच स्व.प्रा.डॉ. सुरेश बनसोड यांची वेळोवेळी प्रेरणा लाभल्याचे सांगत पुढे प्राध्यापक होऊन एमपीएससी व्दारे राजपत्रित वर्ग १ अधिकारी होण्याची ईच्छा दिपालीने यावेळी व्यक्त केली. तिच्या या यशात आई श्रीमती मिनाताई राजेंद्र गवई,वडील श्री.राजेंद्र गवई, भाऊ भूषण, सुयोग यांच्यासह कुटुंबीय,आतापर्यंतचे सर्व शिक्षकवृंद या सर्वांचे मोलाचे मार्गदर्शन, प्रोत्साहन व सहकार्य उपयोगी ठरले असे देखील तिने यावेळी सांगितले. कु.दिपाली सध्या मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी असून जि.प.मराठी शाळा धनज बु येथे अध्यापनाचे घडे गिरवत आहे. नुकताच तिच्या शाळेच्या वतीने सत्कार करण्यात आला. मुख्याध्यापक श्री राठोड व श्रीमती डागा व शिक्षकांनी कु.दिपाली अत्यंत हुशार आणि मनमिळाऊ स्वभावाची असून पीएचडीसाठी सदिच्छा दिल्या.दिपालीचे हे सुयश ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांसाठी निश्चितच प्रेरणादायी ठरणार आहे.

# ११ किलो गांजा जप्त, एकाला अटक

दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** : शहर परिसरात एका कारमधून गांजाची चोरटी वाहतूक केली जात असल्याची माहिती स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाला मिळाली होती. पोलिसांनी सापळा रचून संशयित कारमधून २ लाख ३२ हजार किंमतीचा ११ किलो ६०० ग्रॅम गांजा जप्त केला.

शनिवारी (दि.२६) दुपारी मेहकर शहरातील चोपडे ले–आऊट परिसरात ही कारवाई करण्यात आली.

आरोपी गणेश किशोर दिक्षित (२४) रा.डोणगाव ता. मेहकर याला अटक करून गुन्ह्यात वापरलेली कार जप्त करण्यात आली. गुन्हा दाखल करून एकूण ६लाख ३२हजाराचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. फरार झालेल्या अन्य आरोपींचा पोलीस पथक तपास करीत आहे.स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अशोक लांडे, आशिष घेतले, पीएसआय प्रताप बाजड यांच्या पथकाने ही कारवाई केली.

